राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक - रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.०१/का.०५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २२ डिसेंबर, २०११.

आ दे श

ज्याअर्थी भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने आकाशवाणीवरील जाहिरातींच्या प्रसारणाबाबत केलेल्या तरतुदींना अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक - रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र.१/का.०५, दिनांक ६ जानेवारी, २००९ अन्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकींबाबतीत जाहिरात प्रसारणाकरिता प्रमाणपत्र देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास असतील असे आदेश जारी केले आहेत.

१. आणि ज्याअर्थी राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी सादर केलेल्या जाहिरातींची ध्वनीफित/चित्रफित/सीडी इत्यादी साहित्याची तपासणी करुन त्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र विहित मुदतीत देणे आवश्यक आहे.

२. आणि त्याअर्थी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकींच्याबाबतीत जाहिरात प्रसारणाकरीता प्रमाणपत्र देण्याचे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना तर नगर परिषद / नगरपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. यास अनुसरुन महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी, कार्यालयात टेलिव्हिजन किंवा रेडिओवर जाहिराती देण्यासाठी आलेले अर्ज व त्यासोबत आलेले साहित्य तपासण्यासाठी एक समिती स्थापन करतील. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

<u>महानगरपालिका निवडणुकांकरिताची समिती</u>

| | | |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका आयुक्त | अध्यक्ष |
| २. | महानगरपालिका आयुक्तांनी नेमलेला महानगरपालिकेतील उपायुक्त दर्जाचाअधिकारी | सदस्य |
| ३. | संबधित प्रभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी | सदस्य |

**नगर परिषद/नगर पंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांकरिताची समिती**

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी यांनी नेमलेला जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी | सदस्य |
| ३. | संबधित प्रभागाचे, मतदार विभाग/निर्वाचक गण यांचे निवडणूक निर्णय अधिकारी | सदस्य |

२. महानगरपालिकेच्याबाबतीत संबंधित महानगरपालिकेतील माहिती व जनसंपर्क अधिकारी यांच्याकडे याबाबतीतील सर्व कागदपत्रे राहतील. नगर परिषद/नगर पंचायत, जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणुकांच्याबाबतीत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे याबाबतीतील सर्व कागदपत्रे राहतील.

३. या समितीने राज्य निवडणक आयोगाच्या क्रमांक रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र.१/का.५, दिनांक ६ जानेवारी, २००९ मध्ये नमूद केलेल्या विवरणानुसार जाहिरात प्रसारीत करण्याचे प्रमाणपत्र संबंधितांना निर्गमित करावे. समितीने मान्यता दिलेल्या प्रतिलेख्यांची एक प्रत राज्य निवडणूक आयागाला पाठविण्यात यावी.

राज्य निवडणूक आयूक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति :-

१. सर्व महानगरपालिका-आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व नगर परिषद / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने